


# पारनेर दर्शन






वर्ष १ अंक ३१८, मंगळवार १० सप्टेंबर २०२४ ▪ संपादक : देविदास आबूज ▪ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये


# महिला कॅन्सर तपासणीसाठी राणीताईंचा पुढाकार

▪ रक्तदान शिबिराचेही आयोजन ▪ हंग्यात नियोजन बैठक ▪ १९ ते २९ सप्टेंबर दरम्यान शिबिरांचे आयोजन ▪ नीलेश लंके प्रतिष्ठाण करणार नियोजन

हंगा : विशेष प्रतिनिधी

**महिलांमध्ये मोठया प्रमाणावर वाढत चालेल्या स्तनाच्या कर्करोगावर मात करण्यासाठी जिल्हा परिषदेच्या माजी सदस्या राणीताई नीलेश लंके यांच्या संकल्पनेतून पारनेर-नगर मतदार संघात स्तन कर्करोग तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. आरोग्य यज्ञ २०२४ या थीमखाली आयोजित करण्यात आलेल्या या शिबिरांमध्ये रक्तदार शिबिराचेही आयोजन करण्यात आले आहे.**

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष तसेच नीलेश लंके प्रतिष्ठाण यांच्या माध्यमातून आयोजित करण्यात आलेल्या या शिबिरासंदर्भातील नियोजनासाठी रविवारी हंगे येथे बैठक पार पडली. या बैठकीत राणीताई लंके यांनी या शिबिराची संकल्पना स्पष्ट केली. यावेळी खा. नीलेश लंके यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस तसेच नीलेश लंके प्रतिष्ठाणचे प्रमुख कार्यकर्ते उपस्थित होते.

रक्तदान शिबिरामध्ये सहभागी होणाऱ्या प्रत्येक रक्तदात्यास ५ लाख रूपयांचे विमा कवच मिळणार आहे. त्यात २ लाख रूपयांचा अपघाती विमा, ३ लाख रूपयांचा जीवन विमा, रक्तदाता तसेच त्याच्या नातेवाईकास १ वर्ष मोफत रक्त देण्यात येणार असल्याचे राणीताई लंके यांनी यावेळी बोलताना सांगितले. गुरूवार दि. १९ सप्टेंबर रोजी या शिबिरांना कर्जुलेहर्या व पोखरी येथून प्रारंभ होणार असून दि. २९ सप्टेंबर रोजी चास व निंबळक येथे या शिबिरांची सांगता होणार असल्याचे राणीताई लंके यांनी सांगितले.

नियोजनाच्या बैठकीस खा. नीलेश लंके यांच्यासह राणीताई लंके, राष्ट्रवादी महिला आघाडीच्या तालुकाध्यक्ष सुवर्णा धाडगे, युवतीच्या तालुकाध्यक्ष पुनम मुंगसे, माजी सभापती सुदाम पवार, रा.या. औटी, ॲड राहूल झावरे, बाळासाहेब खिलारी, दिपक लंके, ज्ञानदेव लंके, राजेंद्र शिंदे, प्रविण वारूळे, रामा तराळ, रविंद्र राजदेव, दत्ता निवडूंगे, संदीप मगर, दादा शिंदे, डॉ. आबासाहेब खोडदे, सतिश भालेकर, अर्जुन भालेकर, डॉ. बाळासाहेब कावरे, अशोक रोहोकले, बाळासाहेब पुंडे, बंडू शिरोळे, सुभाष शिंदे, भुषण शेलार, अशोकराव घुले, बापूसाहेब भापकर, प्रा. संजय लाकूडझोडे, लकी कळमकर, विजय डोळ, राधाकृष्ण वाळुंज यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार तसेच नीलेश लंके प्रतिष्ठानचे पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.



▪ जिल्हा परिषदेच्या माजी सदस्या राणीताई लंके यांच्या संकल्पनेतून आयोजित करण्यात आलेल्या आरोग्य यज्ञ या शिबिरांसंदर्भात रविवारी हंगा येथे पार पडलेल्या बैठकीत खा. नीलेश लंके यांनी मार्गदर्शन केले.

## पारनेर शहरात नियोजन

राणीताई लंके यांच्या आवाहानानंतर पारनेर शहर व परिसरातील महिलांच्या तपासणीसाठी विशेष नियोजन करण्यात येणार आहे. एकही महिला या सुविधेपासून वंचित राहणार नाही यासाठी नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष तसेच सर्व नगरसेवक दक्षता घेणार आहेत. रक्तदान शिबिरामध्ये सहभागी होण्यासाठी विशेषतः तरूणांमध्ये जनजागृती करण्यात येणार आहे.

**अर्जुन भालेकर**
जिल्हा उपाध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस

## ग्रामीण महिलांच्या तपासणीसाठी शिबिर

महिलांच्या स्तनाच्या कॅन्सरमुळे देशामध्ये चिंता आहे. ग्रामीण भागात या आजाराचे प्रमाण जास्त आहे. ग्रामीण भागात तपासण्या करण्यात येत नाहीत. त्यासाठीच या शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

**खा. नीलेश लंके**

## जाधव यांची मोलाची मदत

ससून रूग्णालयातील डॉ. किरण जाधव यांची आम्हाला नेहमीच मोलाची मदत मिळते. रात्री अपरात्री पाठविलेल्या रूग्णावर उपचाराची जबाबदारी ते घेतात. डॉ. जाधव व त्यांचे सहकारी या शिबिरांमध्ये सहभागी होऊन रूग्णांची तपासणी करणार असून त्यांचेच सहकारी रक्तदान शिबिराची जबादारीही पार पाडणार असल्याचे खा. लंके यांनी यावेळी सांगितले.

## केवळ निवडणूकीपुरते जनतेपुढे जाऊ नका

ही शिबिरे यशस्वी होण्यासाठी प्रत्येक सहका-याने लक्षपुर्वक काम करावे. निवडणूक आली म्हणून केवळ जनतेपुढे जाऊ नका. शिबिरांच्या आयोजनासाठी तयार करण्यात आलेल्या कोअर कमीटीने इतर कार्यकर्त्यांना विश्वासात घ्यावे. ग्रामपंचायतच्या महिला सदस्यांची गावागावांत बैठक घेउन नियोजन करावे. शासकीय यंत्रणेचा आधार घेण्यापेक्षा आपल्या जीवाभावाच्या यंत्रणेवर फोकस करा. गावागावांत फलक लावून जनजागृती करा.

## दररोज दोन केंद्रांवर तपासणी

एका दिवशी दोन केंद्रांवर या शिबिराचे आयोजन करण्यात येणार आहे. आठ दिवस आगोदर या शिबिराचा प्रचार व प्रसिध्दी करण्यात येईल. प्रत्येक केंद्रावरील कार्यकर्त्यांने महिला स्वयंसेवकांची नियुक्ती करावी. महिलांच्या तपासणीसाठी स्वतंत्र खोलीची व्यवस्था करावी. ससून रूग्णालयाची दोन पथके या शिबिरासाठी उपस्थित राहणार असून दररोज १ हजार ते १ हजार २०० महिलांची तपासणी या शिबिरात करण्यात येणार आहे.

**डॉ. बाळासाहेब कावरे**
अध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस डॉक्टर सेल

## कॅन्सरबाबत जागरूकता वाढली पाहिजे

खा. नीलेश लंके प्रतिष्ठाणने कोरोना संकटात जगात आदर्श काम केले. आता महिलांचा कॅन्सर तसेच रक्तदार शिबिराच्या माध्यमातूनही आदर्श काम उभे राहिल यात शंका नाही. महिलांच्या स्तन कॅन्सरबाबत जागरूकता वाढली आहे, ती अधिक वाढली पाहिजे यासाठी नीलेश लंके प्रतिष्ठाणच्या माध्यमातून हा प्रयोग राबविण्यात येत आहे. या आजारावर लवकर उपचार झाले तर लवकर मात करता येते. रक्तदान शिबराच्या माध्यमातून ४ ते ५ रूग्णांना जीवदान देता येते.

**डॉ. किरण जाधव**
ससून रूग्णालय, पुणे

## विमा कवच मिळणार

एखादा आजार, अपघातानंतर प्रत्येक रूग्णाला रक्ताची आवष्यकता भासते. अनेकदा उपचारासाठी मुख्यमंत्री सहायत्ता निधी किंवा इतर मार्गाने मदत मिळवी यासाठी मला दररोज अनेक फोन येतात. रक्तदान शिबिराच्या माध्यमातून पाच लाखांचे विमा कवच मिळणार असल्याने तातडीच्या प्रसंगी धावपळ करण्याची गरज भासणार नाही.

**खासदार नीलेश लंके**

## आशा सेविका, अंगणवाडी सेविकांची मदत घ्या

प्रत्येक गावातील आशा सेविका, अंगणवाडी सेविका यांची महिलांमध्ये जागृती करण्यासाठी मदत घ्यावी. महिलांना शिबिराच्या स्थळी आणण्यासाठी त्यांची मोलाची मदत होईल. मोफत तपासणी व उपचार होणार असल्याने जास्तीत जास्त भगिनींना या शिबिराचा लाभ कसा होईल याची प्रत्येक कार्यकर्त्याने काळजी घ्यावी. रक्तदानाचे पुण्याचे काम करताना विम्याचे कवचही मिळणार असल्याचे जास्तीत जास्त रक्त पिशव्यांचे संकलन कसे होईल याची प्रत्येकाने काळजी घ्यावी.

**बंडू शिरोळे**
विश्वस्त, खंडोबा देवस्थान

## १० मध्ये २ महिलांना कॅन्सर

देशामध्ये स्तनाच्या कर्करोगाचे प्रमाण भायानक आहे. १० पैकी २ महिलांमध्ये या आजाराचे प्रमाण आढळून येते. या शिबिरामध्ये संशयास्पद महिला आढल्यास त्या महिलेवर नीलेश लंके प्रतिष्ठाणच्या वतीने मोफत उपचार करण्यात येणार आहेत. या आजाराच्या तपासणीसाठी खाजगी रूग्णालयात दोन ते अडीच लाख रूपये खर्च येतो. प्रतिष्ठाणच्या माध्यमातून मोफत तपासणी करण्यात येणार असून कार्यकर्त्यांनी आजूबाजूच्या महिलांना शिबिराच्या स्थळी आणण्यासाठी व्यवस्था करावी. प्राथमिक अवस्थेतील हा आजार शंभर टक्के बरा होत असून या शिबिरानंतर पारनेर तालुका महिलांच्या बाबतीत देशातील कॅन्सरमुक्त तालुका असेल.

**डॉ. बाळासाहेब कावरे**

## राणीताईंच्या पुढाकाराचा अभिमान

राणीताई लंके यांच्या संकल्पनेतून आयोजित करण्यात आलेल्या दोन्ही शिबरे या काळाची गरज आहे. खासदार नीलेश लंके यांच्या सहकाऱ्यांचे आखीव रेखीव नियोजन इतर कुठेही पहावयास मिळत नाही. त्यामुळे या शिबिरांचे नियोजनही नेटके होणार आहे. या शिबिरांसाठी राणीताई यांनी पुढाकार घेतला ही आम्हा महिलांसाठी अभिमानाची गोष्ट आहे.

**सुवर्णा धाडगे**
तालुकाध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस

## सहकारी जबाबदारी पार पाडणार

सर्वसामान्य गोरगरीब जनतेच्या हितासाठी आपण या शिबिरांचे आयोजन केले असून समाजातील प्रत्येक घटकाला त्याचा फायदा झाला पाहिजे. आपल्या सामुहीक प्रयत्नांतून ही शिबिरे यशस्वी होतील यात काडीहीची शंका नाही. सहकाऱ्यांच्या जीवावरच या शिबिरांचे आयोजन करण्यात आले असून ती जबाबदारी प्रत्येक सहकारी यशस्वी पार पाडेल.

**राणीताई लंके**
मा. जि. प .सदस्या

## आपला मतदारसंघ, आपले कुटूंब

गेल्या काही वर्षात आजाराचे प्रमाण मोठया प्रमाणावर वाढले आहे. लहान मुलांनाही कॅन्सरची बाधा होत आहे. ही मुले कुठले व्यसन करत नाहीत तरीही ही समस्या उद्भवत आहेत. आपला मतदारसंघ आपले कुटूंब या संकल्पनेतून आता आरोग्याच्या विषयावर आपल्याला काम करायचे आहे. आरोग्याच्या कामामध्ये सहकाऱ्यांमध्ये स्पर्धा लागली पाहिजे. सहकाऱ्यांनी आरोग्यासारख्या कामासाठी स्पर्धा करावी, भांडणे, जिरवाजिरवी यासाठी नको.

**खा. नीलेश लंके**

## लंके यांची नाळ गोरगरीबांशी जोडलेली

गोरगरीब जनतेशी नीलेश लंके तसेच राणीताई लंके यांची नाळ जोडलेली आहे. राणीताई यांच्या संकल्पनेतून आयोजित करण्यात आलेल्या या दोन्ही शिबिरांचे आयोजन व नियोजन राष्ट्रवादी काँग्रेस व नीलेश लंके प्रतिष्ठाणचे कार्यकर्ते नेटेपणाने करतील यात शंका नाही. दिवाळी फराळ, महानाटय, लोकसभा निवडणूकीत खा. लंके यांच्या कार्यकर्त्यांनी अतिशय चांगल्या पध्दतीने काम केले. तसेच काम या शिबिरांमध्येही होईल. कोरोना संकटात लंके यांच्या सहका-यांनी केलेल्या कामाची जगाने दखल घेतली. आगामी विधानसभा निवडणूकीतही लंके यांचे सहकारी जोमाने मैदानात उतरणार आहेत.

**सुदाम पवार**
प्रदेशाध्यक्ष, नीलेश लंके प्रतिष्ठान








# युवा

# ...तर पुढे धोका आहे !



**असं म्हणतात की जोड्या या स्वर्गातच बनतात. जो जोडीदार आपल्या नशिबात लिहिलेला असतो तोच आपल्याला मिळतो. ही गोष्ट जरी खरी असली तरी स्वतःसाठी जोडीदार कसा निवडावा हे सुद्धा आपल्या हातातच असतं. अनेक व्यक्ती अशा असतात ज्यांना इतरांच्या दबावाखाली लग्न करावं लागतं, मात्र अशा अनेक व्यक्ती असतात ज्यांना जोडीदार निवडण्याची सुवर्णसंधी मिळते. अशीच संधी जर तुम्हाला मिळाली तर त्याचं नक्की सोनं करा. खास करून तरुणींनी या दृष्टीने गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे. कारण त्या आपल्या घरातल्या व्यक्तींना सोडून दुसऱ्याच्या घरात जातात. अशावेळी आपण ज्या व्यक्तीची निवड करतो आहोत तो खरंच आपल्यासाठी योग्य व सुरक्षित आहे का हे जाणून घेणे महत्त्वाचे आहे. असे नाही केले तर मग आयुष्यभर पश्चाताप करण्याची वेळ येऊ शकते. आज जाणून घेऊया अशा काही गोष्टी ज्या प्रत्येक तरुणीने आपल्या जोडीदारात शोधल्याच पाहिजेत. शिवाय ग्रीन फ्लॅग दिसल्याशिवाय मुलांनीही रिलेशनशिपमध्ये पुढे जाण्याचा निर्णय घेऊ नये.**

## रेड फ्लॅग आणि ग्रीन फ्लॅग

रेड फ्लॅग जोडीदाराच्या त्या सवयी असतात, ज्यामुळे तुम्ही दुःखी किंवा अस्वस्थ होतात आणि तुम्हाला पुन्हा पुन्हा त्याच्यावर संशय निर्माण होतो. एकंदर त्या व्यक्ती बाबत खात्री राहत नाही. याचा सरळ अर्थ असे दाखवतो की हे नाते संपुष्टात येण्याच्या मार्गावर आहे. ग्रीन फ्लॅगचा अर्थ असा की जोडीदाराच्या त्या गोष्टी ज्या दर्शवतात की हे नाते तुम्ही दुसऱ्या स्टेजकडे घेऊन जाऊ शकता आणि बिनधास्त त्या व्यक्तीशी लग्न करण्याचा निर्णय घेऊ शकता. तो तुम्हाला नक्की आयुष्यभर सांभाळेल.

## त्यालाही आत्मविश्वास हवा

वैयक्तिक किंवा व्यावसायिक जीवनात यशस्वी होण्यासाठी, व्यक्तीमध्ये आत्मविश्वास असणे खूप महत्वाचे आहे. जर तुमच्या प्रियकराला तुमच्यावर किंवा या नात्यावर विश्वास नसेल, तर याचा अर्थ त्याला तुमच्यासोबत भविष्य दिसत नाही. लग्नासाठी नेहमी अशी व्यक्ती निवडा जी तुमच्यावर फक्त प्रेमच करत नाही तर अवघे आयुष्य तुमच्यासोबत व्यतीत करण्यासाठी ती व्यक्ती ठाम असायला हवी. अशी क्वालिटी जर तुम्हाला तुमच्या आताच्या जोडीदारात दिसत असले तर लग्नाचा विचार करण्यास हरकत नाही.

## ध्येयावर विश्वास ठेवणारा

तुमच्या ध्येयांना आणि स्वप्नांना आधार देणारा जीवनसाथी जर तुम्हाला मिळाला तर तुम्ही खरंच खूप भाग्यवान असाल. म्हणूनच, त्याच्यासोबत भविष्याची स्वप्ने पाहण्याआधी आपल्या प्रियकरामध्ये ही गुणवत्ता आहे का ते पाहणे महत्वाचे आहे. जर तुमचा प्रियकर तुमच्या निर्णयांकडे लक्ष देत नसेल किंवा तुमच्या इच्छांना निरर्थक म्हणत असेल तर तो तुमचा जीवनसाथी होण्यास योग्य नाही असेच संकेत त्यातून मिळतात. कारण जोडीदार असा हवा जो तुमची प्रत्येक गोष्ट आपली म्हणेल.

## मनमोकळा संवाद

संवाद ही आनंदी नात्याची गुरुकिल्ली मानली जाते. जिथे दोन लोक एकमेकांचे ऐकायला तयार असतात तिथे संघर्षाची शक्यता कमी असते. अशा परिस्थितीत जर तुम्ही आणि तुमचा प्रियकर कोणत्याही गोष्टीबाबत जर मनमोकळा संवाद साधत असाल तर याचा अर्थ तुमच्यामधील बॉन्डीन्ग आणि केमिस्ट्री खूप सुंदर आहे आणि तुम्ही हे नाते आयुष्यभरासाठी जपू शकता.

## प्रभावाखाली येणारा नसावा

अशा लोकांवर विश्वास ठेवणे कठीण आहे जे चटकन एखाद्याच्या प्रभावाखाली येतात. म्हणूनच बॉयफ्रेंडमध्ये आपल्या भावी पतीला शोधण्यापूर्वी नेहमी त्याचे व्यक्तिमत्त्व पूर्णपणे तपासा. तो कोणाच्याही बोलण्यात लगेच येत नाही ना, किंवा छोट्याश्या गोष्टीवरून सुद्धा संशयी वृत्तीने वागत नाही ना ते तपासा. जर त्याला अशी सवय असले तर लग्नानंतर तुमचे आयुष्य उध्वस्त व्हायला वेळ लागणार नाही. कारण अशी लोकं कधीच सारासार विचार करणारी नसतात आणि त्याचा त्रास स्वतःला होतो.

## चुकांची जबाबदारी घेणारा

आपल्या चुका मान्य करणे हे एक उत्तम व्यक्ती असण्याचे लक्षणे आहे. जे आपल्या चुका मान्य करत नाहीत, ते सर्व चुकांसाठी इतरांना दोष देतात. मग अशा व्यक्तीसोबत आयुष्यभर आनंदाने जगता येईल का? हा प्रश्न स्वतःला विचारा आणि अशा जोडीदारापासून दूरच राहा.

## तुमच्यासाठी वेळ काढणारा

जर तुमचा जोडीदार त्याच्या बिझी वेळापत्रकातूनही तुमच्यासाठी वेळ काढत असेल तर याचा अर्थ तुम्ही त्याच्यासाठी महत्त्वाचे आहात. त्याच्या आयुष्यात तुमची किंमत खूप मोठी हे आणि तुमचे स्थान अव्वल आहे. ही गोष्ट चांगल्या जोडीदाराचेही लक्षण आहे. त्यामुळे अशा व्यक्तीसोबत तुम्ही सुखी संसाराची स्वप्ने पाहू शकता.

# स्माईलिंग डिप्रेशन!



**नैराश्यात अनेक जण एकटे राहतात, रडणे, ओरडतात, अशा लोकांची सतत चिडचिड होते. पण काही जण लोकांच्या बाबतीत असे होत नाही. काही जण त्यांचे दुःख एक स्माईलच्या मागे लपवतात. या प्रकाराला स्माईलिंग डिप्रेशन म्हणतात. नात्यात अनेकदा होणाऱ्या छोट्या मोठ्या भांडणांमुळे अनेकदा नैराश्य येते. एखाद्या व्यक्तीच्या आत्महत्येनंतर बरेचदा लोक त्याच्याबद्दल सांगतात की अशी व्यक्ती खूप छान होती, नेहमी आनंदी दिसायची, प्रेमळपणे भेटायची. अखेर ती व्यक्ती आत्महत्येसारखे पाऊल कसे उचलू शकते? जेव्हा बाहेरून आनंदी दिसणारे लोक नैराश्यामुळे आत्महत्या करतात तेव्हा अशी प्रकरणे स्माईलिंग डिप्रेशनची असतात. हसरा चेहराही नैराश्याचा बळी ठरू शकतो हे समजून घेणे आवश्यक आहे.**

## तीन प्रमुख लक्षणे

अभ्यासक सांगतात, की असे नैराश्य इतर प्रकारांपेक्षा खूप वेगळे आहे, त्यामुळे ते ओळखणे थोडे कठीण आहे. पण या आजाराची तीन मुख्य कारणे सांगता येतात. त्यात प्रथम, अंतर्यामी दुःख, कोणत्याही कामात रस नसणे आणि लवकर थकणे. म्हणजेच तुम्ही तुमच्या दैनंदिन जीवनात खूप काही करत असाल, पण कुठेतरी तुम्हाला त्या कामांमध्ये रस नाही. यानंतर, तुम्हाला नेहमी थकवा जाणवतो . जर तुम्हाला नेहमी डोकेदुखी किंवा शरीर दुखत असेल तर आजच याकडे लक्ष द्या.

- स्वतःची तुलना इतर लोकांशी करू लागतो : नैराश्याने ग्रासलेल्या व्यक्तीच्या मेंदूतील सेरोटोनिनचे प्रमाण कमी होते. त्यानंतर आपण स्वतःची इतर लोकांशी तुलना करू लागतो. आपल्या सभोवतालच्या लोकांपैकी आपण सर्वात वाईट आहोत. तुम्ही तुमचा वाईट काळ तुमच्या चांगल्या काळाशी जोडू लागता आणि स्वतःलाच अपशब्द वापरु लागतात. तुम्ही केलेले प्रत्येक काम इतरांच्या तुलनेत कमी आणि निरुपयोगी वाटते. अशा परिस्थितीत तुम्ही तुमच्या आजूबाजूच्या लोकांशी याबद्दल बोलणे महत्त्वाचे आहे.
- तुम्ही बरे होऊ शकता : अनेक लोकांना त्यांची प्रतिमा खूप महत्त्वाची आहे. यामुळे ते नाराज असले तरी ते हसतच राहतात. मानसोपचार तज्ज्ञांच्या मते, हसऱ्या चेहऱ्यामागे दडलेले नैराश्याचे सर्वात मोठे कारण असू शकतो हे आपण स्वीकारू इच्छित नाही. आपल्या आजूबाजूचे लोक किंवा आपले मित्र काय विचार करतील किंवा काय म्हणतील या कारणाने मानसोपचार तज्ज्ञाला भेटायला अनेक जण घाबरतात आणि प्रत्येक समस्येवर आत्महत्या हाच उपाय मानू लागतात.
- लोकांशी बोलण्याचीही इच्छा नसते : ज्यांना नैराश्य असते त्याबद्दल इतर लोकांशी बोलण्याचीही इच्छा नसते, त्यांच्यासाठी नैराश्य हे सर्वात धोकादायक असते. अशा परिस्थितीत माणूस आत्महत्येचा विचार करू लागतो. अशा परिस्थितीत नैराश्याने ग्रासलेल्या व्यक्तीला असे वाटू लागते की त्याला कोणीही मदत करू शकत नाही.

### नैराश्यावर इलाज

आपल्याला अनेकदा हे समजत नाही की नैराश्याचे निदान झाल्यानंतर पुढची पायरी काय असेल? हे जाणून घेतल्यावर, सर्वप्रथम, होय, आपण नैराश्याने ग्रस्त आहात आणि आपल्याला मानसोपचार तज्ञाची आवश्यकता आहे हे स्वीकारण्याचे धैर्य गोळा करणे महत्वाचे आहे. यानंतर, ज्यांच्यावर तुमचा सर्वात जास्त विश्वास आहे अशा लोकांशी तुमच्या मनःस्थितीबद्दल बोला. आज अनेक थेरपी आणि औषधे उपलब्ध आहेत, ज्यामुळे नैराश्य संपते.

### विश्वास जिंका

जर आजूबाजूला कोणी या प्रकारचा हसत-खेळत नैराश्याचा बळी असेल, तर आपण त्याला आरामदायी वाटणे आवश्यक आहे आणि त्याची परिस्थिती जाणून घ्या. या परिस्थितीवर मात करण्यासाठी हसत-खेळत नैराश्याने ग्रासलेल्या लोकांचा विश्वास जिंकणे खूप महत्वाचे आहे.

# अशा रिलेशनशिपचे भवितव्य काय?

**कोणतेही नाते हे दोन व्यक्तींनी मिळून बनते. त्यामुळेच जर ते निभवायचे असेल तर दोघांकडून प्रयत्न होणे देखील तितकेच गरजेचे असते. जेव्हा दोघांपैकी केवळ एकच व्यक्ती नाते वाचवण्यासाठी धडपडत असतो आणि दुसऱ्या व्यक्तीला त्याची कदरही नसते तेव्हा अशा रिलेशनशिपचे भवितव्य काहीच नसते. हीच स्थिती खूप काळ राहिली तर नात्याशिवाय अन्य संबंध सुद्धा बिघडत जातात. एकवेळ अशी येते की दोन्ही व्यक्ती एकमेकांना एकमेकांचे शत्रू समजू लागतात.**



अनेकदा जी व्यक्ती संवेदनशील असते ती भावनिकदृष्ट्या निखळून पडते. हे होऊ द्यायचे नसेल तर वेळीच नात्याची स्थिती ओळखायला हवी. अनेकांना हेच ओळखता येत नाही आणि त्याचा परिणाम म्हणून आयुष्य उद्ध्वस्त होते. असे नाते हे अनेकदा एकतर्फी नाते म्हणूनच ओळखले जाते. आज आम्ही तुम्हाला असे काही संकेत सांगणार आहोत जे तुम्हाला नाते ओळखण्यात मदत करू शकतात.

### नेहमी तुम्हीच समजून घेत असाल तर...

जर नात्यातील एकच व्यक्ती नेहमी तडजोड करत असेल तर नाते संबंध हळूहळू बिघडू लागतात आणि ते उद्ध्वस्त व्हायला वेळ लागत नाही. तसेच या गोष्टीतून हेच दिसते की तुमचे नाते घट्ट नाही. उलट केवळ एका व्यक्तीमुळे ते टिकून असल्याने कमकुवत आहे. तडजोड करावी लागणे हे एकतर्फी प्रेमाचे सर्वात सामान्य लक्षण आहे. प्रेमात पडल्यानंतर तुम्ही जर सतत समजून घेत असाल वा तडजोड करत असाल तर सावधान व्हा. कारण जोडीदाराला सवय लागली तर तो त्याचा गैरफायदा घेऊ शकतो.

### ओढ फक्त तुम्हाला असेल तर

कोणतेही नाते टिकवण्यासाठी दोन व्यक्तींचे समान प्रयत्न आवश्यक असतात. अशा परिस्थितीत, जर केवळ तुम्हीच तुमच्या जोडीदाराला भेटायला किंवा संपर्कात राहायला, तुमच्या भावना शेअर करायला सांगत असाल, पण तो मात्र त्यासाठी काहीच प्रयत्न करत नसेल वा त्याला या गोष्टींची पर्वा नसेल तर हे देखील एकतर्फी नातेसंबंधाचे लक्षण आहे.

### नेहमी तुम्हीच चुकीचे ठरत असाल तर



जर तुमचा पार्टनर कोणत्याही चुकीची जबाबदारी घेत नसेल आणि नेहमी तुम्हीच माफी मागावी आणि समजून घ्यावे अशी अपेक्षा करत असेल तर हे स्पष्टपणे एकतर्फी प्रेमाचे लक्षण आहे. कारण जर त्यालाही तुमचा आदर असेल तर प्रत्येकवेळी तो तुम्हाला चुकीचे ठरवणार नाही.

### वारंवार स्वतःला सिद्ध करणे

एकतर्फी नात्यात समोरची व्यक्ती तुम्हाला अशा स्थितीत आणते की तुम्ही स्वतःचे महत्त्व विसरता. तुम्हाला या नात्यात राहायचे आहे की नाही हे माहित नसते पण तरीही जोडीदारासाठी स्वतःला पुन्हा पुन्हा सिद्ध करत असला तरहे सुद्धा एकतर्फी नात्याचे लक्षण आहे आणि अशा नात्यामधून तुम्ही जास्त अपेक्षा करू शकत नाहीत.

### एकटेपणा जाणवणे

जर तुम्ही एकतर्फी नात्यात असाल तर तुम्हाला तुमच्या जोडीदाराकडून कधीच भावनिक आधार मिळणार नाही. जेव्हा तुम्ही तुमच्या मनातील गोंधळ त्याच्याशी शेअर घेण्याचा प्रयत्न कराल तेव्हा तो एक तर तुम्हाला इग्नोर करेल किंवा वरवर दिलासा देईल. पण मनापासून तो कधीच तुमची गोष्ट एकून घेणार नाही. कारण त्याच्यासाठी तुमच्या फिलिंगला किंमत नसेल. त्यामुळे असे काही होत असेल तर हे देखील एकतर्फी नात्याचे लक्षण आहे व अशा नात्यातून तुम्ही वेळीच बाहेर पडले पाहिजे.

# ही लक्षणे जाणवली तर इथेच थांबवा सर्वकाही...



**मॅच्युरिटी म्हणा किंवा जबाबदारी, हा एक असा शब्द आहे, जो वेळीच लक्षात आला तर माणसाचे जीवन यशस्वी होते. जबाबदारीबद्दल बोलायचे तरती तर शिकवून कळत नाही ती वेळेनुसारच येते आणि परिस्थितीनुसारच शिकावी लागते. मात्र, मुली या सर्व गोष्टी खूप लवकर शिकतात, पण मुलांनी त्यांच्या जबाबदाऱ्या ओळखणे खूप गरजेचे आहे. कारण लग्नानंतर त्यांची जबाबदारी पूर्णपणे दुप्पट होते. अशा परिस्थितीत पतीने परिपक्व आणि जबाबदार कसे असावे हे जाणून घेतले पाहिजे. पण ही गोष्ट सुद्धा खरी आहे की काही लोकांना जबाबदार होण्यासाठी जास्त प्रयत्न करावे लागत नाहीत. पण सगळ्यांच्या बाबतीत असं होत नाही. काही मुले लग्नानंतरही प्रत्येक गोष्टीसाठी इतरांवर अवलंबून असतात. त्यांनाही त्यांचे काम करण्यात आळस वाटतो. जर तुम्हाला शंका असेल की तुमचा नवरा देखील या श्रेणीत येतो, तर आज आम्ही तुम्हाला अशी काही लक्षणे सांगणार आहोत जी दर्शवितात की तुम्ही एका बेजबाबदार व्यक्तीशी लग्न केले आहे.**

- घरच्या कामात मदत न करणे : आजकालच्या मुलींची अपेक्षा असते की आपल्या पतीने सुद्धा घरकामात आपल्याला मदत करावी आणि ही अपेक्षा अजिबात चुकीची नाही. कारण ऑफिसचे काम सांभाळून घरचे काम करणे ही एकटी पत्नीची जबाबदारी नाही. पण तुमचा नवरा मात्र तुम्हाला घरकामात मदत करत नसेल वा तुम्हाला होणारा त्रास पाहूनही त्याचे मन विरघळत नसेल तर समजून घ्या की त्याला अजूनही त्याच्या जबाबदाऱ्यांची जाणीव नाही. तो अजूनही लग्नाआधी होता तसाच वागतो आहे.
- सतत घरी उशिरा येणे : अधूनमधून कामावर उशीर होणे अगदी सामान्य आहे. पण तुमचा नवरा नेहमी उशिरा येतो आणि कोणत्याही गोष्टीसाठी वेळेवर पोहोचत नसेल, तर हे एक बेजबाबदार व्यक्ती असण्याचेच लक्षण आहे. अशा व्यक्तीसोबत तुमचे जीवन व्यर्थ आहे.
- सगळं काही तुम्हालाच करावं लागतं : पत्नी आपल्या पतीसाठी सर्व काही करण्यास तयार होते. पण त्या बदल्यात पतीने तिची काळजी घेतली नाही तर पत्नीचा हिरमोड होणे साहजिक आहे. तुमच्या जीवनात तुमच्या पतीचे काहीच योगदान नसेल तर तो एक बेजबाबदार व्यक्तीच आहे.
- वचन न पाळणे : वचन मोडणे ही केवळ नात्यासोबतची प्रतारणाच नाही तर एक त्रासदायक भावना सुद्धा आहे. जर तुमचा नवरा तुम्हाला एखादे वचन वा आश्वासन देतो पण वेळ आली की ते विसरतो आणि जे मनाला हवे तेच करतो. तुमच्या मानाचा अजिबात विचार करत नाही तर हे लक्षण आहे की तुम्ही अशा पुरुषाशी लग्न केले आहे ज्याला तुमच्या मनाची अजिबात पर्वा नाही.
- उधळपट्टी करणे : लग्नानंतर कोणत्याही पतीला आर्थिक नियोजन हे करावेच लागते. पण जर तुमचा नवरा खर्चीक असेल आणि भविष्यासाठी त्याच्याकडे कोणतीही बचत नसेल तर



तुमचे भविष्य खरोखरच धोक्यात आहे. निवृत्तीनंतर आजारपण किंवा घर चालवण्यासाठी पैसा खूप महत्त्वाचा असतो. यात केवळ पत्नीनेच नव्हे तर पतीनेही मोठे योगदान दिले पाहिजे. जर तुमचा नवरा पैसा अजिबात वाचवत नसेल तर ते त्याच्या बेजबाबदारपणाचे लक्षण आहे.

## शॉर्ट न्यूज

### पोस्टाने हेरॉईन मागविणारा तरुण ताब्यात

■ **श्रीरामपूर :** पोस्टाने हेरॉईन मागविणाऱ्या श्रीरामपूर शहरातील तरुणाला पोलिसांनी चौकशीसाठी ताब्यात घेतले आहे. जिल्हा पोलिस प्रमुख राकेश ओला यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखा व शहर पोलिसांनी या तरुणाला ताब्यात घेतले आहे. शहरातील वार्ड क्रमांक सातमध्ये राहणाऱ्या तरुणाने पोस्टमार्फत हेरॉइनमागवल्याची माहिती केंद्रीय नार्कोटिक्स विभागाला मिळाली. केंद्रीय पथकाने नगरचे पोलिस प्रमुख राकेश ओला यांना कळविले. त्यानंतर एसपी ओला यांनी स्थानिक गुन्हे शाखेला चौकशीचे आदेश दिले.

### पूर्व-पश्चिम रस्त्यासाठी निधी मंजूर

■ **श्रीगोंदा :** मतदारसंघात आत्तापर्यंत महामार्गाचे काम झाले असल्यामुळे अनेक गावाचा विकास झाला, आता महायुती सरकारने श्रीगोंदा मतदारसंघातील पूर्व-पश्चिम रस्त्याच्या कामांसाठी निधी दिला आहे. यातून काही सत्यांची कामे लवकरच सुरू होणार असल्याची माहिती भाजप प्रदेश उपाध्यक्ष विक्रमसिंह पाचपुते यांनी दिली, तसेच आ बबनराव पाचपुते यांच्या वाढदिवसानिमित्त मोफत आरोग्य शिबीराचे आयोजन करण्यात आले असल्याचे त्यांनी सांगितले.

### आमदार रोहित पवारांनी पिकांची केली पाहणी

■ **जामखेड :** येथे आमदार रोहित पवार यांनी शेतकऱ्यांच्या बांदावर जाऊन पिकांची केली पाहणी लवकरात लवकर सर्व पिकांचे पंचनामे करण्याचे तहसीलदार माळी साहेब यांना दिले आदेश. जामखेड तालुक्यातील बहुतेक ठिकाणी या वर्षी मोठ्या प्रमाणात पाऊस झाला आहे, त्यामुळे अनेक शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. पिकात मोठ्या प्रमाणात पाणी साचलेले आहे. पीक वाया गेलेले आहेत, त्यामुळे अतिवृष्टीने बाधित सर्व शेतकऱ्यांच्या शेतातील पिकांचे पंचनामे तात्काळ करावेत. पंचनामे करताना कोणताही शेतकरी वंचित राहू नये.

### शिक्षक नियुक्तीला शिक्षक भारतीचा विरोध

■ **नगर :** २० पेक्षा कमी पटसंख्या असलेल्या शाळेत सेवानिवृत्त, डी. एड., बी. एड. धारकांची कंत्राटी पद्धतीने नियुक्ती करण्यात येणार आहे. ५ सप्टेंबर रोजी शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने हा निर्णय घेतला असून त्यांना १५ हजार रुपये वेतन देण्यात येणार आहे. शासनाच्या या निर्णयाला शिक्षक भारती व संघटनांनी विरोध दर्शविला आहे. शिकविण्याचे वय संपल्यामुळे शिक्षकांना सेवानिवृत्त करतात. कंत्राटी नव्हे तर कायमस्वरूपी शिक्षकांची नियुक्ती करण्याची मागणी शिक्षणमंत्र्यांकडे करण्यात आली.

### करजगाव विद्यालय इमारत खोल्यांची दुरवस्था

■ **नेवासा :** तालुक्यातील करजगाव येथे रयत शिक्षण संस्थेचे श्री छत्रपती शिवाजी विद्यालय आहे. शालेय इमारतीच्या चार खोल्यांची मोठी दुरवस्था झाली आहे. त्याची त्वरीत दुरुस्ती करावी, अशी मागणी पालकांनी केली आहे. शाळेच्या खोल्या स्थापनेपासूनच्या असून पावसाळ्यात गळत आहे. तसेच पडवीच्या स्लॅपचे गज जीर्ण झाले असून उघडे पडले आहेत. यामुळे विद्यार्थ्यांसह शिक्षकांना जीवघेणी कसरत करावी लागत आहे. अशा जीवघेण्या वातावरणात विद्यार्थ्यांना शिक्षण घ्यावे लागत आहे. यामुळे जुनी इमारत पाडून याठिकाणी नवीन इमारत बांधण्याची मागणी केली आहे.

# रांजणगावात दीड लाख भाविकांचे मुक्तद्वार दर्शन!

## १२ हजार द्वारकऱ्यांचा द्वार यात्रेत सहभाग

**शिरूर : प्रतिनिधी**

**गणेश चतुर्थीनिमित्त अष्टविनायकांपैकी एक असलेल्या श्रीक्षेत्र रांजणगाव गणपती येथे भाद्रपद गणेशोत्सवकाळात वर्षातून एकदाच येणाऱ्या श्री महागणपतीच्या मुक्तद्वार दर्शनाचा गेल्या ४ दिवसांत दीड लाख भाविकांनी लाभ घेतला.**



गणेश चतुर्थीनिमित्त मध्यरात्री १ वाजता श्रींची पूजा व आरती करून मंदिर भाविकांना मुक्तद्वार दर्शनासाठी खुले करण्यात आले. गणेश चतुर्थीला श्रींच्या पालखीचे शेळके आळीतील मानकऱ्यांच्या उपस्थितीत उत्तरद्वार यात्रेकरिता ढोकसांगवी गावाकडे दु. १२.१५ वाजता वाजतगाजत मोठ्या उत्साहात प्रस्थान झाले.या वेळी शिरूर हवेलीचे आमदार ॲड. अशोक पवार, देवस्थान ट्रस्टच्या अध्यक्षा स्वाती पाचुंदकर, मुख्य विश्वस्त डॉ. ओमकार देव, उपाध्यक्ष संदीप दौंडकर, सचिव डॉ. तुषार पाचुंदकर, खजिनदार विजय देव, माजी जि. प. सदस्य शेखर पाचुंदकर, उद्योजक दत्तात्रय पाचुंदकर, रावसाहेब पाचुंदकर, पुजारी, ग्रामस्थ, आजी माजी पदाधिकारी, कर्मचारी व भाविक उपस्थित होते. भाद्रपद गणेशोत्सवकाळात देवस्थानच्या वतीने अनेक धार्मिक कार्यक्रमाचे दररोज आयोजन करण्यात आले आहे. देवस्थान ट्रस्टच्या वतीने दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना पिण्याचे पाणी, आच्छादित दर्शनरांग, मोफत महाप्रसाद, सुसज्ज दर्शनरांग, मोफत आरोग्य तपासणी, प्रशस्त वाहनतळ इत्यादी सुविधा पुरविण्यात आल्या आहेत. यात्राकाळामध्ये मंदिर व परिसरात आकर्षक फुलांची सजावट व विद्युत रोषणाई देवस्थान ट्रस्टच्या वतीने करण्यात आली आहे.

सुमारे १२ हजार द्वारकऱ्यांनी चार दिवसांच्या द्वारयात्रेत आपला सहभाग घेतला होता. तर चौथ्या दिवशी एकाच दिवसात २०५ भाविकांनी ७८ किमी अंतर अनवाणी चालून चारही द्वार पूर्ण केल्याचे देवस्थान ट्रस्टच्या अध्यक्षा स्वाती पाचुंदकर यांनी सांगितले.

# अल्पवयीन मुलीला पळवून नेताना परप्रांतीयाला पकडले

## टोळीतील इतर साथीदार फरार झाल्याचा संशय

**राहुरी : प्रतिनिधी**

**पाटणा (बिहार) येथील २० वर्षीय तरुणाने राहुरीतील ८ वर्षांच्या मुलीला पळवण्याचा प्रयत्न नागरिकांच्या सतर्कतेमुळे फसला.**



संबंधित तरुणाला जमावाने बेदम चोप देत पोलिसांच्या ताब्यात दिले. दरम्यान, मारहाण होत असताना परप्रांतीय तरुणाने चार वेळेस शिट्टी वाजवल्याने मुले पळवणाऱ्या या टोळीतील इतर साथीदार फरार झाल्याचा संशय व्यक्त होत आहे. शनिवारी सकाळी पावणेआठच्या सुमारास राहुरीच्या बाजारपेठेतील रस्त्यावर ही घटना घडली. धीरज कलटून कुमार, वय २० असे आरोपीचे नाव आहे.

राहुरीतील ८ वर्षीय मुलगी वडिलांकडून पैसे घेऊन दूध आणण्यासाठी बाजारपेठेत गेली होती. यावेळी मुलीच्या पाठीमागून चालत येणाऱ्या धीरज कलटून कुमार वय २० याने तुझे घर छोडता हू असे, म्हणत मुलीचा हात धरला. हा प्रकार पाहून बाजारपेठेतील दुकानदारांनी संबंधित तरुणास हटकले. मुलीला पळवून नेण्याचा प्रयत्न होत असल्याचे त्यांना लक्षात आले.

यावेळी उपस्थित जमावाने संबंधित तरुणास लाथाबुक्क्याने मारहाण करून पोलिसांच्या ताब्यात दिले. मुलीच्या पालकाने राहुरी पोलिसात दिलेल्या फिर्यादीवरून आरोपी धीरजकुमार याच्यावर अपहरणाचा प्रयत्न तसेच पोस्को कलमानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलिस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली राहुरी पोलिस करीत आहेत.

# नगरच्या २८० बस कोकणात !

## रोज ३५० फेऱ्या रद्द । जिल्ह्यातील शटल बससेवा लांब पल्ल्याच्या गाड्यांवर परिणाम

**नगर : प्रतिनिधी**

**गणेशोत्सवानिमित्त अहमदनगर विभागातून २८० एसटीबस ४ सप्टेंबरपासून कोकणात पाठवल्या होत्या. त्यामुळे जिल्ह्यात दररोज सुमारे ३५० फेऱ्या रद्द होत आहेत. त्याचबरोबर इतर जिल्ह्यांतूनही बस पाठवल्यामुळे प्रवाशांना बसची वाट पहावी लागत आहे. परंतु, एसटी प्रशासनाने १५५ बस रविवारपर्यंत माघारी आल्याचे सांगत, प्रवासी सेवा सुरळीत होत असल्याचे सांगितले.**



**बससेवा सुरळीत होणार नगर विभागातून २८० बस कोकणात पाठवल्या होत्या, त्यापैकी काही गाड्या नगरला परत आल्या . नगरच्या केवळ १२५ गाड्या सद्यस्थितीत कोकणात थांबल्या आहेत. काही फेऱ्या रद्द होत होत्या, बस परत आल्याने प्रवासी सेवा सुरळीत होत आहे.**

**कमलेश धनराळे**
**विभागीय वाहतूक अधिकारी, नगर.**

गणेशोत्सवानिमित्त शहरी भागातून कोकणात गावी जाणाऱ्या प्रवाशांची संख्या मोठी असते. या प्रवाशांची गैरसोय होऊ नये, यासाठी राज्यभरातून सुमारे ४ हजार बसची व्यवस्था करण्यात आली. त्यात नगर विभागासह, नाशिक, पुणे विभागातून बस पाठवण्यात आल्या आहेत. त्यामुळे इतर मार्गांवरील दैनंदिन फेऱ्यांवर परिणाम झाला आहे. एकट्या नगर विभागात शुक्रवारी २४ तासांत १ हजार ९०० फेऱ्या नियोजित असतात, त्यापैकी ४०३ फेऱ्या रद्द झाल्या होत्या. ४ दिवसांत फेऱ्या रद्द होत असल्याने जिल्ह्यातील प्रवाशांची गैरसोय झाली होती. परंतु, शनिवारपासून काही बस माघारी येत आहेत. सद्यस्थितीत १२५ बस कोकणात थांबवण्यात आल्या आहेत. जादा बसचे नियोजन करता जिल्ह्यातील शटल बससेवा, लांब पल्ल्याच्या गाड्यांवर परिणाम झाला.

# दुसरा आमदार आल्यावर बारामतीला माझी किंमत कळेल !

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांची खंत । बारामतीतून विधानसभा निवडणूक न लढण्याचे संकेत

**बारामती : प्रतिनिधी**

**जिथं पिकतं तिथं विकत नाही. लोकसभेला जशी गंमत झाली तशी जर गंमत होणार असेल तर झाकली मूठ सव्वा लाखाची चांगली. बारामतीला एकदा माझ्याशिवाय दुसरा आमदार मिळाला पाहिजे. दुसरा आमदार आला की माझी किंमत तुम्हाला कळेल, अशी खंत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी रविवारी एका कार्यक्रमात बोलून दाखवली.**




दरम्यान, अजित पवार यांच्या या वक्तव्याचा ते बारामतीतून विधानसभा निवडणूक लढवणार नाहीत असा अर्थ लावला जात आहे. असे बोलून अजित पवार भावनिक राजकारण करत आहेत, अशी टीका विरोधकांकडून होत आहे. अजित पवार म्हणाले, एकदा बारामतीकरांना मी सोडून आमदार मिळाला पाहिजे. मग त्या वेळी माझी १९९१ ते २०२४ पर्यंतच्या कामाची तुलना करा. त्या वेळी १९९१ पासूनची माझी कामे तुम्हाला कळतील. मीही आता ६५ वर्षांचा झालो. बारामतीत मी वेगळी भूमिका घेतली नाही तरीही पराभव झाला. बारामतीला माझ्याशिवाय दुसरा आमदार मिळाला पाहिजे. दुसरा आमदार आला म्हणजे तुम्हाला माझी किंमत कळेल.

मी केलेली कामे तुम्हाला कळतील. आम्ही सकाळी लवकर उठतो त्यावर आमची काहीजण चेष्टा करतात. त्यात माझा वैयक्तिक काही स्वार्थ नाही. मुस्लिम समाजाने मला काही निवेदन दिले तर काही जण वेगळे वक्तव्य करतात. मी फुले, शाहू, आंबेडकरांचा विचार सोडणार नाही. बारामतीत काम करत असताना एका समाजाने सांगावं की आमच्यावर अन्याय झाला. कार्यकर्ता कसा सक्षम होईल आपण बघितले पाहिजे.

**शरद पवारांमुळेच बारामती उभी राहिली**

अजित पवार यांच्या वक्तव्यावर शरद पवार गटाचे नेते जितेंद्र आव्हाडांनी खोचक प्रतिक्रिया दिली. ते म्हणाले, शरद पवार हे उच्च पदस्थ राजकारणी असल्याने कोणी पंतप्रधान असो, कुठलाही मंत्री असो ते सगळे साहेबांच्या संबंधापोटी बारामतीत व्यवस्थित लक्ष देत होते. त्यांना (अजित पवार) असे वाटत असेल की त्यांच्यामुळे बारामती उभी राहिली तर हा त्यांचा गैरसमज आहे. बारामती खरी उभी राहिली ती पवार साहेबांमुळे. अर्थमंत्र्यांना मुख्यमंत्र्यांच्या हाताखालीच काम करावे लागते, वडीलधाऱ्या माणसाचे अपमान करणे, पाडून बोलणे, वडीलधाऱ्या माणसांची मृत्यूची इच्छा व्यक्त करणे हे लोकांना आवडले नाही, पटत नाही. अजित पवार काम करत नाही का? काम करतात. मात्र, काकांना बाहेर काढावे हे लोकांना आवडले नाही, असेही आव्हाड म्हणाले.

## वाचकांच्या लेखणीतून

# गमतीशीर परिचय

त्यावेळेस मी कॉलेजच्या शिक्षणासाठी नुकताच मुंबईला आलो होतो. १९७६-७८ चा काळ असावा. मी फर्स्ट इयर किंवा इंटर आर्ट्‌स्ला म्हणजे कॉलेजच्या दुसऱ्या वर्षात शिकत असावा. मुंबईतील अंधेरी पश्चिमच्या नवरंग टॉकीजजवळ भर्डावाडीत आमचा परिवार राहत असे. तेथून चालत चालत पाच मिनिटांच्या अंतरावर भवन्स कॉलेज आहे. तेथे मी शिकत होतो.



आपल्या गावाकडची साधारण दोनतीन घरेच आसपासच्या भागात होती. पण तीही दूरवर होती. विरंगुळा म्हणून मी नाक्यावरच्या फूलवाल्याच्या टपरीवर संध्याकाळी गप्पा मारायला जात असे. तेथे भोसले आडनावाचे तिघे भाऊ हारगजरे विणण्याचे आणि हारांच्या पुड्या घरोघर टाकण्याचा व्यवसाय करीत असत. ते पुणे जिल्ह्यातील ग्रामीण भागातून तिकडे येऊन वसले होते. बिचारे राहणीत आणि वागण्यात साधेच होते. चौथीपाचवीपर्यंत शिक्षण झालेले असावेत. जवळच हाऊसिंग बोर्डाच्या बिल्डिंगमध्ये ते राहत असत.

एका संध्याकाळी मी त्या टपरीवर गप्पा मारीत बसलो होतो. तेथे माझ्याच वयाचा, १७-१८ वयाचा मुलगा आणि एक प्रौढ माणूस आला. टपरीवरच्या मधव्या भोसलेबंधूने हार विणता विणता माझा त्यांना परिचय करून दिला. तो त्यांना म्हणाला, हा ढवळे. इथं भर्डावाडीत राहतो. भवन्स कालेजात शिकंतोय. नंतर मी त्या दोघांचा परिचय करून घेतला. मी त्या मुलाला विचारले, तुझं नाव काय? तो म्हणाला, मी टवळे आणि हे माझ्या शेजारीच राहतात. यांचं नाव पवळे. ढवळे, टवळे आणि पवळे ही यमक साधलेली आणि ठेकेबाज आडनावे ऐकून हारवाले बंधू आणि आम्ही तिघेही खोखो हसत सुटलो! हे जाणीवपूर्वक नव्हते. सहजगत्या घडले होते. पण होते ते सत्य होते.

मनात म्हटले, असाही गमतीशीर परिचय असू शकतो?

■ **नाना ढवळे**

८२८६९१३२२३
निघोज, ता. पारनेर,
जि. अहमदनगर.






# जामगांवकर एक हजार देशी वृक्षांची लागवड करणार!

जामगांव : प्रतिनिधी

**नाम फाउंडेशच्या माध्यमातून गावातील बिरोबा तलावातील गाळ काढल्याने तेथील पिण्याच्या तसेच शेतीच्या पाण्याचा प्रश्न मार्गी लागल्याने जामगांवकरांनी नाम फाउंडेशनप्रती कृतज्ञता व्यक्त केल्यानंतर फाउंडेशनचे सदस्य अभिनेते मकरंद अनासपुरे यांनी जामगावकरांनी एक हजार देशी वृक्षांची लागवड करण्याच्या केलेल्या आवाहानास प्रतिसाद देत सरपंच पुष्पा माळी यांनी एक हजारांहून अधिक वृक्षांची लागवड करून त्याचे संगोपन करण्यात येणार असल्याचे सांगितले.**




नाम फाउंडेशच्या किमयामुळे जामगांवचा पाणी प्रश्न मार्गी लागल्यानंतर त्याचे सरपंच पुष्पा माळी तसेच ग्रामपंचायत सदस्यांच्या वतीने बिरोबा तलावातील पाण्याचे पुजन करण्यात आले. त्यासंदर्भातील वृत्त पारनेर दर्शनमध्ये प्रसिध्द झाल्यानंतर उद्योजक सुरेश पठारे यांच्या माध्यमातून अभिनेते मकरंद अनासपुरे यांनी हे वृत्त वाचून आनंद व्यक्त केला. व जामगांवकरांना वृक्षारोपणाचे आवाहन केले होते. त्यांच्या आवाहनास प्रतिसाद देत जामगांवकर आता वृक्षारोपण करून त्याचे संगोपन करणार आहेत.

मकरंद अनासपुरे यांनी जामगांवकरांना दिलेल्या संदेशात म्हटले आहे की, नाम फाउंडेशन ही माणसांनी माणसांसाठी चालविलेली माणूसकीची चळवळ आहे. या फाउंडेशनच्या निमित्ताने ग्रामीण भागातील शेतीच्या तसेच पिण्याच्या पाण्याचा प्रश्न काही अंशी मार्गी लागतो आहे. ही नाम फाउंडेशनच्या सर्वांनाच सुखावणारी गोष्ट आहे.

नाम फाउंडेशनच्या या कामाचा लाभ घेऊन जामगांवकरांनी परिसरात तसेच आजूबाजूला स्वतः मनाने, तनाने आणि धनाने देशी झाडांची लागवड करावी. त्यानिमित्ताने जमिनीमध्ये पाण्याचा स्त्रोत टिकून राहिल. एखाद्या वर्षी कमी पर्जन्यवृष्टी झाली तरी त्याचा सर्वांना त्रास होणार नाही. वृक्षारोपण ही अत्यंतीक महत्वाची गोष्ट आहे.

नाम फाउंडेशला भेट म्हणून साधारण एक हजार देशी झाडे जर लावली आणि त्याचे संगोपन झाले तर आनंद होईल. नाम फांडेशन ग्रामीण भागातील पाण्याच्या प्रश्नासाठी कटीबध्द आहे. गेल्या नऊ वर्षात नाम फाउंडेशनने महाराष्ट्रातील १ हजार गावांमध्ये जवळपास दहा टीएमसी इतक्या पाण्याचे काम केले आहे. या फाउंडेशनचा आपल्याला अंशतः अल्पसा भाग होता आले याचा मानापासून आनंद आहे. सर्व जामगांवकरांना, सरपंच आणि सदस्यांना मनापासून सदिच्छा आणि शुभेच्छा.

# नऊ कुस्तीपटूंची विभागीय पातळीवर स्पर्धेसाठी निवड; ५ सुवर्ण तर ४ रौप्यपदकांची कमाई

भाळवणी : प्रतिनिधी

**कर्जत येथे झालेल्या जिल्हास्तरीय कुस्ती स्पर्धेत भाळवणी येथील गुरुकुल कुस्ती संकुलाच्या मल्लांनी विजयी सलामी दिली असून नऊ कुस्तीपटूंची विभागीय पातळीवर स्पर्धेसाठी निवड झाली आहे जिल्हास्तरीय स्पर्धेत संकुलाच्या पाच कुस्तीपटूंना सुवर्णपदक तर चार कुस्तीपटूंना रौप्यपदक मिळाले आहे.**



कर्जत येथे झालेल्या जिल्हास्तरीय कुस्ती स्पर्धेत गौरी गणेश जाधव, स्वरा बेल्हेकर, ज्ञानेश्वरी भांबरकर ,निलेश उचाळे , गौरव रोहोकले यांना सुवर्णपदक तर अरविंद जाधव , कृष्णा रोहोकले,प्रतीक रोहोकले, शंभू गणेश जाधव यांनी रौप्यपदकांची कमाई केली आहे. पुणे येथे होणाऱ्या विभागीय कुस्ती स्पर्धेसाठी या नऊ कुस्तीपटूंची निवड करण्यात आली आहे.

जिल्हास्तरीय स्पर्धेत गुरुकुल कुस्ती संकुलाच्या तीन महिला कुस्तीपटूंना सुवर्णपदक मिळाले आहे.या सर्व कुस्तीपटूंना गुरुकुल कुस्ती संकुलाचे संचालक व राष्ट्रीय कुस्ती पंच पै.गणेश जाधव यांचे मार्गदर्शन लाभले आहे. या यशस्वी कुस्तीपटूंचे भाळवणी परिसरातून अभिनंदन होत आहे.

# कबड्डी स्पर्धेत निघोजचे सलग पाचव्या वर्षी वर्चस्व

## इंग्लिश मिडियम स्कुलच्या मुलींच्या संघाची कामगिरी

निघोज : प्रतिनिधी

**अलिकडेच पारनेर येथे पार पडलेल्या तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धेत निघोज येथील न्यू इंग्लिश मिडियम स्कुलच्या १७ वर्षे वयोगटातील मुलींच्या कबड्डीच्या संघाने निर्भेळ यश संपादन करून या स्पर्धे वर सलग पाचव्या वर्षी आपले वर्चस्व सिध्द केले.**



■ तालुकास्तरीय कबड्डी स्पर्धेत निघोजच्या न्यू इंग्लिश मिडियम स्कुलच्या संघांनी निर्भेळ यश संपादन केले.

पारनेर शहरातील किसान इंटरनॅशल स्कुलमध्ये आयोजित करण्यात आलेल्या या स्पर्धेत न्यू इंग्लिश मिडियम स्कुलच्या १४ व १७ वर्षे वयोगटातील मुलींच्या संघाने सहभाग नोंदविला होता. १४ वर्षे वयोगटाच्या संघाने कर्जुलेहर्या येथील संघावर १० गुणांनी विजय संपादन केला तर १७ वर्षे वयोगटातील मुलींच्या संघाने हंगा विद्यालयाच्या संघावर १५ गुणांनी विजय संपादन करीत निर्भेळ यश संपादन केले.

१४ वर्षे वयोगटाच्या संघाचे नेतृत्व आकांक्षा घुले हिने तर १७ वर्षे वयोगटातील संघाचे नेतृत्व अनुष्का गायकवाड हिने केले. दोन्ही विजयी संघाला प्राचार्य डायस, व्यवस्थापन समितीच्या सदस्या संगिता कवाद, क्रिडा शिक्षक दत्ता मांडगे, श्रीमती मोरे यांचे मार्गदर्शन लाभले.

दोन्ही विजयी संघातील खेळाडूंचे बाबासाहेब कवाद सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष शांताराम कळसकर, उपाध्यक्ष प्रकाश कवाद, सचिव वसंत कवाद, संस्थेचे सर्व विश्वस्त, बाबासाहेब कवाद निघोज नागरी सहकारी पतसंस्थेचे सर्व पदाधिकारी, संचालक मंडळ यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांनी अभिनंदन केले.

### १४ वर्षे वयोगट संघ

**आकांक्षा घुले संघनायक, सिध्दी मुळे उपसंघनायक, वेदिका पठारे, अवनी मेसे, गायत्री औटी, ईश्वरी बेलोटे, रिध्दी मुळे, समृध्दी वरखडे, साईशा बेलोटे, इशिका वराळ, स्वरा घोडे, समृध्दी सालके**

### १७ वर्षे वयोगट संघ

**अनुष्का गायकवाड संघनायक, मानसी पठारे उपसंघनायक, समृध्दी कोल्हे, अमृता घोडे, श्रेया भाकरे, ऋतुजा घोडे, अनुष्का सुपेकर, धनश्री पठारे, प्रतिक्षा ढवळे, ज्ञानेश्वरी औटी, अनुष्का रसाळ, ईश्वरी वरखडे**

# भक्ती चौधरी यांची क्रेडिट ऑफिसरपदी निवड

## खा. नीलेश लंके यांनी केला सन्मान



नांदूरपठार : प्रतिनिधी

**नांदूरपठार येथील भक्ती ज्ञानदेव चौधरी यांची पंजाब नॅशनल बँकेच्या क्रेडिट अधिकारीपदी नुकतीच निवड झाली. भक्ती यांच्या या यशाचे कौतुक करीत खासदार नीलेश लंके यांनी त्यांचा सत्कार करीत शुभेच्छा दिल्या. भक्ती या खा. नीलेश लंके यांचे स्वीय सहाय्यक संदीप चौधरी यांच्या पुतणी आहेत.**

यावेळी बोलताना खा. लंके म्हणाले, पारनेर तालुका हा बुध्दीवंतांची खाण आहे. विविध क्षेत्रामध्ये तालुक्यातील विद्यार्थी उच्च पदावर असून भक्ती चौधरी यांनीही तालुक्याच्या लौकीकास कामगिरी करीत पंजाब नॅशनल बँकेतील मोठया पदावर काम करण्याची किमया साधली आहे. भक्ती यांच्या या यशाचे इतर विद्यार्थ्यांनी अनुकरण करून यश संपादन करण्याचे आवाहन लंके यांनी केले.

विविध स्पर्धा परीक्षांची तयारी करण्यासाठी आपण निघोज व कान्हूरपठार येथे अधुनिक अभ्यासिका उभारल्या असून त्याचा फायदा स्पर्धा परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांना होणार आहे. तालुक्यातील विद्यार्थ्यांनी या अभ्यासिकांचा फायदा घेऊन तालुक्याच्या लौकीकात भर घालण्याचे आवाहन खा. लंके यांनी यावेळी केले.

सत्काराप्रसंगी भक्ती यांचे वडील ज्ञानदेव चौधरी, संतोष चौधरी, चंद्रकांत मोढवे आदी उपस्थित होते.

# डी.बी.एम.स्कुलला आदर्श विद्यालय पुरस्कार

## जे.डी.मापारी, शितल मापारी यांचा सन्मान

राळेगणसिध्दी : प्रतिनिधी

**नगरच्या रोटरी क्लबच्या वतीने देण्यात येणाऱ्या रोटरी ज्ञान गौरव पुरस्कार सोहळयात राळेगणसिध्दी येथील डी.बी.एम. स्कुलला आदर्श विद्यालय पुरस्काराने सन्मानीत करण्यात आले. शाळेने शिक्षण क्षेत्रात दिलेले योगदान तसेच या क्षेत्रात केलेल्या उत्कृष्ट कामगिरीवर या पुरस्काराने शिक्कामोर्तब झाले आहे.**



विद्यालयाचे संस्थापक अध्यक्ष जे. डी.मापारी यांनी हा पुरस्कार स्विकारला. यावेळी विद्यालयाच्या प्राचार्य शितल मापारी यांचा त्यांच्या शैक्षणिक क्षेत्रातील अप्रतीम योगदानाबददल विद्याभुषण पुरस्काराने सन्मानीत करण्यात आले. प्राचार्य शितल मापारी यांनी ग्रामीण भागात उच्च दर्जाचे शिक्षण उपलब्ध करून देत विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासासाठी अथक प्रयत्न केले आहेत. विद्यार्थ्यांच्या नैतिक, बौध्दीक आणि शारीरीक विकासावर भर देण्यात येत असल्याने शहरातील विद्याथ्यार्थ्यांना हे विद्यालय आकर्षित करत आहे.

रविवारी नगर येथे पार पडलेल्या या सोहळयास रयत शिक्षण संस्थेच्या सदस्या मीनाताई जगधने, माध्यमिक शिक्षणाधिकारी अशोक कडूस, प्राथमिक शिक्षणाधिकारी भास्कर पाटील, योजना शिक्षणाधिकारी बाळासाहेब बुगे, मा. शिक्षण आयुक्त दिनकर टेमकर हे उपस्थित होते.

या कार्यक्रमात गुणवंत शिक्षकांचा विशेष सन्मान करण्यात आल. विद्याभुषण पुरस्कारांतर्गत शाळेतील शिक्षकांनी केलेल्या उत्कृष्ट कामाचे कौतुक करण्यात आले. विद्यालयाच्या या यशामुहे संस्थेची शिक्षण क्षेत्रात प्रतिष्ठा वाढली आहे.

रोटरी क्लबचे अध्यक्ष डॉ. राजीव चिटगोपेकर, सचिव निखिल कुलकर्णी, साहित्य संचालक दिनकर टेमकर यांचे या सोहळयाच्या आयोजनामध्ये योगदान होते. पुरस्कार वितरणानंतर उपस्थित मान्यवरांनी विद्यालयाच्या विविध उपक्रमांचे, शैक्षणिक दर्जाचे कौतुक केले. या पुरस्कारामुळे विद्यालयाचे सर्व शिक्षक, विद्यार्थी आणि पालक यांना प्रोत्साहन मिळेल असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

# धार्मिक संस्कृती रुजविण्याचे काम संतांनी केले

## श्रीहरी महाराज पवार यांचे प्रतिपादन

निघोज : प्रतिनिधी

**महाराष्ट्राची संत परंपरा मोठी आहे संतांनी धार्मिक संस्कृती रुजविण्यासाठी अविरत प्रयत्न केले असून आपल्या देशाची धार्मिक संस्कृती ही जगात सर्वश्रेष्ठ असल्याचे प्रतिपादन श्रीहरी महाराज पवार यांनी व्यक्त केले.**



निघोज येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात कार्यरत असलेल्या व सेवाभावी काम करणाऱ्या शिलाताई अनिल उचाळे यांच्या प्रथम पुण्यस्मरण कार्यक्रमात ते बोलत होते. कपिलेश्वर मंगल कार्यालयात झालेल्या या कार्यक्रमाला विविध संस्थांचे पदाधिकारी व ग्रामस्थ तसेच उचाळे परिवाराचे आप्तेष्ट नातेवाईक व मित्र परिवार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी पवार महाराज म्हणाले शिलाताई उचाळे यांनी समाजात काम करताना आरोग्य केंद्राच्या माध्यमातून सर्वसामान्य जनतेला आरोग्याची सेवा मिळावी यासाठी त्यांनी प्रयत्न केले हा सेवाभाव त्यांनी केला. हीच समाजासाठी सेवाभावी प्रेरणा आहे. हाच सेवाभाव प्रत्तेकाच्या अंगी असणे गरजेचे आहे. आपण ईश्वरी सेवा करतो त्याप्रमाणे मानवी सेवा म्हणजे समाजसेवेच्या माध्यमातून सेवाभाव करणे गरजेचे आहे. शिलाताई उचाळे यांनी हाच सेवाभाव केला म्हणून समाज आजही त्यांचे नाव घेतो हाच नावलौकिक हीच खरी संपत्ती असल्याचे प्रतिपादन त्यांनी व्यक्त केले आहे.

यावेळी संदीप पाटील वराळ जनसेवा फौंडेशनचे तालुका अध्यक्ष सचिन वराळ पाटील, माजी सरपंच ठकाराम लंके, शिवबा संघटनेचे संस्थापक अध्यक्ष अनिल शेटे, उपसरपंच माऊली वरखडे, माजी उपसरपंच उमेश सोनवणे, कपिलेश्वर उद्योग समूहाचे सर्वे सर्वा सोमनाथ वरखडे, सेवानिवृत्त प्राचार्य रामचंद्र महाराज सुपेकर, भगवान लामखडे, बाबासाहेब कवाद निघोज नागरी सहकारी संस्थेचे उपाध्यक्ष नामदेवराव थोरात, पारनेर तालुका पत्रकार संघाचे उपाध्यक्ष भास्करराव कवाद, निघोज नागरी सहकारी पतसंस्थेचे वरिष्ठ अधिकारी रामदास गाडीलकर, गुणोरे सोसायटीचे माजी चेअरमन अशोकराव मेसे, आपला गणपती समाजसेवा प्रतिष्ठानचे अध्यक्ष रवि रणसिंग, देखरेख संघाचे संचालक भाऊसाहेब मेचे, आदिंनी आदरांजली वाहिली. यावेळी कै. शिलाताई उचाळे यांच्या प्रतिमेचे सुनिल उचाळे, राजू उचाळे, अनिल उचाळे तसेच उचाळे परिवार यांच्या हस्ते पुजन करण्यात आले तसेच अभिवादन करण्यात आले.जिल्हा सहकारी बँकेचे सेवानिवृत्त शाखाधिकारी पवार साहेब यांच्या हस्ते प्रवचनकार व किर्तनकार श्रीहरी महाराज पवार यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सोमनाथ महाराज वरखडे , महादेव उचाळे यांनी केले शेवटी सहाय्यक कामगार तलाठी सुनिल उचाळे तसेच चंद्रकांत उचाळे, यांनी आभार मानले. यावेळी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. खंडोबा पाउतके परिसर मंडळ, मुलिका गणेश मंडळ, गुरुदत्त गणेश मंडळ तसेच सुनिल उचाळे मित्र मंडळ यांनी हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.

# शेतकरी कुटुंबातील स्नेहल झाली पोलीस दलात भरती

## चिंचोली गावच्या शिरपेचात मानाचा तुरा

चिंचोली : प्रतिनिधी

**पारनेर तालुक्यातील चिंचोली मधील बांगरवाडीतील कोकणे परिवारातील कु. स्नेहल बाबू कोकणे हिची ठाणे पोलीस दलामध्ये निवड झाली आहे. ही निवड पोलीस भरती प्रक्रियेमधून झाली असून निकाला नंतर कुटुंबीय व नातेवाईक मित्र परिवार यांच्या वतीने आनंद व्यक्त करण्यात आला.**



शेतकरी कुटुंब परंतु जिद्द मनाशी ठेवून गेल्या दोन वर्षापासून प्रचंड मेहनत कष्ट करत पोलीस दलात जायचेच ही मनाशी खूणगाठ बांधून खाकीचे स्वप्न रंगवत प्रयत्न करत असलेली स्नेहल कोकणे हिला अखेर २०२४ मध्ये झालेल्या पोलीस भरती मध्ये यश मिळाले आणि ठाणे पोलीस दलामध्ये तिची निवड झाली.

निवडीनंतर वडील बाबू कोकणे व आई लता कोकणे या स्नेहलच्या मातापित्यांच्या चेहऱ्यावर मुलीच्या कष्टाला अखेर मिळालेल्या यशाचा आनंद दिसून येत होता. कु. स्नेहल कोकणे ही चिंचोली येथील सर्वसामान्य शेतकरी कुटुंबातील मुलगी परंतु मोठी बहीण आशा कोकणे-शिंदे पोलीस दलामध्ये असल्याने खाकी वर्दीचे लहानपणापासूनच स्वप्न उराशी बाळगून ते पूर्ण करण्यासाठी ती प्रयत्न करत होती. मोठी बहीण शितल आणि सोनाली यांचा पण तिला पाठींबा होता.

प्राथमिक सातवी पर्यंतचे शिक्षण चिंचोली येथे पूर्ण केल्यानंतर दहावीपर्यंत माध्यमिक शिक्षण दहा किलोमीटर वडझिरे येथे जाऊन सुंदराबाई गहिनाजी लंके विद्यालयात पूर्ण केले. व पुढे अकरावी व बारावी पारनेर येथील न्यू इंग्लिश स्कूल विद्यालयात त्यानंतर पुढे पदवीच्या शिक्षण न्यू आर्ट्स अँड कॉमर्स सायन्स कॉलेज पारनेर येथे घेत असताना स्पर्धा परीक्षेची आवड निर्माण झाली व अभ्यास करत असतानाच खाकी वर्दीचे असलेले स्वप्न कु. स्नेहलला स्वस्त बसू देत नव्हते. श्लोक अकॅडमी पारनेर येथे अविनाश परांडे सर, मुंबई पोलीस महेंद्र शेळके, ठाणे शहर पोलीस रामा शेळके, ठाणे शहर पोलीस स्वप्निल चौधरी यांच्या विशेष मार्गदर्शनाखाली पोलीस भरतीची तयारी सुरू केली यश अपयशाची पायरी चढत तयारी ही सुरू होती. अखेर २०२४ मध्ये दि. ३ सप्टेंबर मध्ये पोलीस भरतीच्या माध्यमातून प्रयत्नांना व कष्टाला यश मिळाले १५० पैकी १३१ गुण घेऊन ठाणे पोलीस दलामध्ये निवड झाली.

निवडीनंतर चिंचोली ग्रामस्थांच्या वतीने आनंद व्यक्त करण्यात आला यावेळी गावांमधील ज्येष्ठ ग्रामस्थ महिला युवक यांनी फोन करून स्नेहलला शुभेच्छा देत तिच्या यशाचे कौतुक केले. उद्योजक संतोष हिंगडे, अमोल हिंगडे, चिंचोली गावचे माजी सरपंच सतीश पिंपरकर, निघोज येथील प्रसिद्ध ग्राफिक डिझायनर अशोक बाबर, पत्रकार गणेश जगदाळे यांनी निवडीबद्दल विशेष अभिनंदन केले आहे.

# निघोजच्या इंग्लिश स्कुलला आदर्श विद्यालय पुरस्कार

## राजश्री वारे यांना विद्याभुषण व नेशन बिल्डर अवॉर्ड

निघोज : प्रतिनिधी

**रोटरी क्लब ऑफ अहमदनगर च्या वतीने अयोजित करण्यात येणा-या ज्ञान गौरव पुरस्कारांतर्गत निघोज येथील न्यू इंग्लिश स्कुलला यंदाच्या आदर्श विद्यालय पुरस्काराने सन्मानीत करण्यात आले.**



रविवार दि. ८ सप्टेबर रोजी या पुरस्कराचे शिक्षणाधिकारी दिनकर टेमकर यांच्या हस्ते प्राचार्य डायस यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. नगर रोटरी क्बलचे अध्यक्ष डॉ. बालूराजू, माध्यमिक शिक्षणाधिकारी अशोक कडूस यांच्या हस्ते शिक्षिका राजश्री वारे यांना विद्याभुषण व नॅशनल बिल्डर अवॉर्डन सन्मानीत करण्यात आले. यावेळी विद्यालयाच्या शिक्षिका मोनीका, गटशिक्षणाधिकारी बाळासाहेब बुगे, रयत शिक्षण संस्थेच्या सदस्या मीनाताई जगधने, प्राथमिक शिक्षणाधिकारी भास्कर पाटील यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. शिक्षकांच्या परीश्रमामुळे विद्यालयास मिळालेल्या या पुरस्कराबददल बाबासाहेब कवाद सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष शांताराम कळसकर, उपाध्यक्ष प्रकाश कवाद, सचिव वसंत कवाद, कन्हैयया उद्योग समुहाचे अध्यक्ष शांताराम मामा लंकेय, व्यवस्थापन प्रतिनिधी संगिता कवाद, निघोज संस्था परीवार तसेच न्यू इंग्लिश मिडियम स्कुलचे विश्वस्त, पदाधिकारी यांनी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांचे अभिनंदन केले.

# तालुकास्तरीय कबड्डी स्पर्धेत राळेगणसिद्धीचे वर्चस्व

## अण्णा हजारेंनी केले विजेत्या खेळाडूंचे अभिनंदन

राळेगणसिद्धी : प्रतिनिधी

**राळेगणसिद्धी विद्यालय व जिल्हा क्रीडा कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने तालुकास्तरीय मुलांच्या कबड्डी स्पर्धा नुकत्याच राळेगणसिद्धी येथे पार पडल्या. या स्पर्धेत राळेगणसिद्धी विद्यालयाच्या दोन संघांनी विजेतेपद पटकावल्याने आपले वर्चस्व प्रस्थापित केले.**



या स्पर्धांमध्ये राळेगणसिद्धीच्या श्री संत निळोबाराय विद्यालयाने परंपरेला साजेसा खेळ करीत १४ वर्ष व १७ वर्ष वयोगटात प्रथम क्रमांक मिळवून तालुकास्तरीय कबड्डी स्पर्धेत आपला दबदबा कायम ठेवला. १४ वर्षे वयोगटात द्वितीय क्रमांक पारनेरच्या न्यू इंग्लिश स्कूलने पटकावला तर १७ वर्षे वयोगटात निघोजच्या मुलिकादेवी विद्यालयाने द्वितीय क्रमांक मिळवला. १९ वर्षे वयोगटात प्रथम क्रमांक टाकळीच्या ढोकेश्वर विद्यालयाने पटकाविला तर द्वितीय क्रमांक अळकुटीच्या साईनाथ हायस्कूलने मिळवला.

या क्रीडा स्पर्धेचे उद्घाटन श्री संत यादवबाबा शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष सदाशिव मापारी यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी संस्थेचे संचालक निवृत्ती मापारी, यादवराव गायकवाड, नानाभाऊ औटी, रामभाऊ उगले, मा. सरपंच लाभेश औटी, प्राचार्य सोपानराव घाणे, तालुका क्रीडाशिक्षक संघाचे अध्यक्ष बापू होळकर, पर्यवेक्षक रमेश गारूडकर उपस्थित होते. या स्पर्धत तालुका उपाध्यक्ष दत्ता मांडगे, गंगाराम खोडदे, बाबाजी साळुंके, अक्षय शिंदे, ज्ञानेश्वर मापारी, ऋषिकेश औटी, सचिन मापारी, योगेश गाजरे यांनी पंच म्हणून काम केले.

या स्पर्धा यशस्वीपणे पार पाडण्यासाठी पारनेर तालुका अध्यक्ष होळकर सर, क्रीडा शिक्षक विनायक उंडे, सहसचिव महेंद्र गायकवाड, सुभाष पठारे, दिपक फापाळे, पांडुरंग परकड यांनी प्रयत्न केले.

ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष संपत पोटे सरपंच जयसिंगभाऊ मापारी यांनी विजेत्या खेळाडूंचे अभिनंदन केले आहे. प्राचार्य सोपानराव घाणे यांनी प्रास्ताविक केले तर क्रीडा विभागप्रमुख महेंद्र गायकवाड यांनी आभार मानले. स्पर्धे चे सूत्रसंचालन सुभाष पठारे यांनी तर समालोचन संतोष तरटे केले. स्पर्धा पाहण्यासाठी परिसरातील तरुण व नागरिकांनी गर्दी केली होती.

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com